SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000 PGBUTR - 2609139
FAX +91-0231-2691533 & 2692333 website: www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
दुरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000 पी.जी.बी.यु.टी.आर. 2609139
फॅक्स : +91-0231-2691533 व 2692333.
e-mail : pgbutr@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क. :– एस.यु. / पीजीबीयुटीआर / रेकग्नेशन / 2021 / 8487 दिनांक : 03 FEB 2022

प्रति,

1) अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

2) प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये /
मान्यताप्राप्त संस्था / स्वायत्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :– पदव्युत्तर शिक्षक मान्यता तसेच एम.फिल. / पीएच.डी. मार्गदर्शक मान्यतेबाबत

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, पदव्युत्तर शिक्षक मान्यता तसेच एम.फिल. / पीएच.डी. मार्गदर्शक मान्यतेबाबत (यु.जी.सी., नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्वे 2016 च्या अनुषंगाने) सुधारित नियमावली सोबत जोडली आहे. सदर नियमावलीनुसार आपल्या अधिविभागामधील / महाविद्यालयामधील / संस्थेमधील पात्र शिक्षकांचे ऑनलाईन अर्ज ( दिनांक 4 फेब्रुवारी 2022 ते 10 फेब्रुवारी 2022 पर्यंत) व अर्जाची एक छापील प्रत (One Hard Copy) आपल्यामार्फत विद्यापीठ कार्यालयास दि. 11 फेब्रुवारी 2022 पर्यंत विहित शुल्कासह (रू. 1000 / –) व आवश्यक कागदपत्रांसह जमा करावयाचे आहेत. तरी सदर परिपत्रक आपल्या अधिविभागातील / महाविद्यालयातील / संस्थेमधील सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणावे. ऑनलाईन अर्ज **दिनांक 4 फेब्रुवारी 2022 ते 10 फेब्रुवारी 2022 पर्यंत** या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login या link वर उपलब्ध आहेत.

आपला विश्वासु,

प्र कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## एम.फिल. व पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक तसेच पदव्युत्तर शिक्षक मान्यतेबाबतचे ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भातील सूचना

शिवाजी विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर अधिविभाग, सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था येथिल नियमित शिक्षक यांचेकडून एम.फिल. व पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक तसेच पदव्युत्तर शिक्षक मान्यतेबाबत अर्ज मागविण्यात येत आहे. संबधित शिक्षकांनी या सूचनापत्रकातील सूचना, तसेच सोबत जोडलेली नियमावली विचारात घेऊन, ऑनलाईन अर्ज भरणेबाबत प्रक्रिया करावयाची आहे. ऑनलाईन अर्ज भरणेबाबत नमूद करणेत आलेल्या खालिल सूचनांप्रमाणे अर्ज भरण्यात यावेत.

1. एम.फिल व पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक तसेच पदव्युत्तर शिक्षक मान्यतेबाबतचे ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी दिनांक 4 फेब्रुवारी 2022 ते 10 फेब्रुवारी 2022 पर्यंत असेल. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छापील प्रत दि. 11 फेब्रुवारी 2022 रोजी विद्यापीठ कार्यालयात सायंकाळी 6.00 पर्यंत जमा करावयाचे आहेत. अर्ज व आवश्यक कागदपत्रांची सांक्षाकित प्रत प्राचार्य/संचालक /अधिविभागप्रमुख यांचेमार्फत ( **प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र प्रत** ) सादर करणे आवश्यक आहे.

2. एम.फिल./पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक तसेच पदव्युत्तर शिक्षक मान्यता याबाबतची नियमावली सोबत जोडली आहे.

3. अर्ज भरणेबाबतची सविस्तर माहीती http://www.unishivaji.ac.in/online_portal/ वर **PGBUTR Section** मध्ये - **Video Demo for how to fill M.Phil/Ph.D. Guideship/PG Teacher Application**.या लिंकवर उपलब्ध आहे

4. एम.फिल. व पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक तसेच पदव्युत्तर शिक्षक मान्यतेबाबतचे ऑनलाईन अर्ज भरणेकरीता http://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login मधुन तसेच PG-BUTR Section मध्ये Application for PG Teachers and M.Phil/Ph.D. Guide recognition (From 16/11/2021 to 5 /12/2021) या लिंकवरून Login व्हावे- User Role प्राध्यापक / Faculty निवडावा व **संबंधीत सर्व टॅब वरील सर्व माहीती भरावी** तद्नंतर online form generate करावा तसेच फि रू 1000/– online भरावेत. (सदरची संपुर्ण प्रक्रिया online आहे ) .

5. **महत्वाचे** : संलग्नित महाविद्यालये/संस्था/विद्यापीठ अधिविभाग येथील पात्र शिक्षकांनी सदर ऑनलाईन अर्ज भरताना Online Portal वरील University Departments / College मधून Online Affiliation Login for College या लिंक वरून Login व्हावे. Login Name हे संबंधीत College Login मधुन घ्यावेत. **संबंधीत शिक्षकाने सर्व माहीती भरावी**

   **तथापी ज्या** शिक्षकांचा Login Name नसेल अथवा नविन नियुक्ती असेल तर अशा शिक्षकांनी Affiliation Portal मधे College login व्दारे User Creation करून घ्यावे. User Creation झाल्यानंतर User Login करून **संबंधीत शिक्षकाने सर्व माहीती भरावी** जेणेकरून सदरची माहिती विद्यापीठास पुढील कार्यवाहीस उपलब्ध होईल. या संदर्भात काही तांत्रिक अडचण आलेस याबाबत 0231–2309378 या क्रमांकावर संपर्क साधावा

6. पदव्युत्तर शिक्षक मान्यता आणि एम.फिल. व पीएच.डी. मार्गदर्शक मान्यतेचे अर्ज स्वतंत्र असून त्याचे शुल्क प्रत्येकी रू. 1000/– असे असेल.

7. विहित मुदतीत अर्ज (ऑनलाईन व छापील प्रत) प्राप्त न झालेस, सदर अर्जाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही.

8. **अपात्र अर्जाबाबत व विहित मुदतीत, विहित शुल्कासह व आवश्यक कागदपत्रासह अर्ज न आल्यास याबाबत विद्यापीठाकडून कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

9. पदव्युत्तर शिक्षक आणि एम.फिल., पीएच.डी. मार्गदर्शक मान्यतेबाबतचा ऑनलाईन अर्ज करताना काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास संगणक केंद्राशी (0231–2609378) व पीजीबीयुटीआर विभागाशी (0231–2609139) (email – pgbutr@unishivaji.ac.in) संपर्क साधावा.